# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

## कार्यालयीन सूचना क्र. ०१/२०२४

क्र. संगाबाअवि/युजीसी-एमएमटीटीसी/१८४/२०२४ दिनांक: २१ मे, २०२४

शिक्षण क्षेत्रात व्यापक बदल घडवून आणण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० (National Education Policy-2020) ची अंमलबजावणी सुरू झालेली असून या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी शिक्षक, संशोधक, शिक्षणतज्ज्ञ, पालक आणि विद्यार्थी यांच्यामध्ये व्यापक जनजागृती करणे आणि त्यांना प्रशिक्षित करणे अत्यावश्यक आहे. यादृष्टीने विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांनी दिनांक ०५ सप्टेंबर, २०२३ पासून NEP Orientation & Sensitization Programme या प्रशिक्षण कार्यक्रमाची सुरूवात केली आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमांच्या माध्यमातून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० (National Education Policy-2020) चे विविध पैलू व उद्दिष्ट समजून घेणे व त्यांची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करणे, नवीन शिक्षण पद्धती आणि तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यासाठी आवश्यक कौशल्ये विकसित करणे, शिक्षणाच्या गुणवत्तेत सुधारणा करून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणे आणि या धोरणाचे अंमलबजावणी विषयक मार्गदर्शन देशातील ख्यातनाम शैक्षणिक तज्ञांच्या मदतीने करण्यात येणार आहे.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील मालवीय मिशन शिक्षक प्रशिक्षण केंद्राद्वारे NEP Orientation & Sensitization Programme या प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन आभासी पद्धतीने करण्यात येत असून सदर प्रशिक्षण कार्यक्रम संदर्भातील माहिती या कार्यालयीन सुचनेसह आपल्या सुलभ संदर्भाकरिता सोबत जोडण्यात येत आहे.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ परिक्षेत्रात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक असलेल्या सर्वसमावेशक दृष्टिकोनाची निर्मितीकरिता सर्व संलग्नित महाविद्यालय, संशोधन केंद्र व विद्यापीठातील पद. शैक्षणिक विभागांना सुचित करण्यात येते की, आपल्या महाविद्यालय व पद. शैक्षणिक विभागातील सर्व नियमित, अंशदायी, तासिका तत्वावरील शिक्षक त्याचप्रमाणे मान्यता प्राप्त सर्व संशोधन केंद्रात कार्यरत संशोधक अभ्यासक यांना विद्यापीठातील मालवीय मिशन शिक्षक प्रशिक्षण केंद्राद्वारे आयोजित NEP Orientation & Sensitization Programme या प्रशिक्षण कार्यक्रमात नोंदणी करून सहभागी होण्यासाठी आपल्या स्तरावरून सूचना देण्यात याव्यात.

मा. कुलगुरूंचे आदेशान्वये -

स्वा/-
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

प्रत:

१) विभाग प्रमुख/समन्वयक/संचालक, सर्व पद. शैक्षणिक विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
२) प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालय, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
३) प्रमुख, सर्व मान्यता प्राप्त संशोधक केंद्र, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
४) स्वीय सहाय्यक, मा. कुलगुरू कार्यालय, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
५) स्वीय सहाय्यक, मा. प्र-कुलगुरू कार्यालय, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
६) स्वीय सहाय्यक, कुलसचिव कार्यालय, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
७) उपकुलसचिव, महाविद्यालयीन विभाग: सदर कार्यालयीन सूचना आपल्या स्तरावरून सर्व संलग्नित महाविद्यालयांचे निदर्शनास आणावी.
८) उपकुलसचिव, विद्या विभाग: सदर कार्यालयीन सूचना आपल्या स्तरावरून सर्व सन्माननीय अभ्यास मंडळांचे सदस्य व मा. अध्यक्ष यांचे निदर्शनास आणावी.
९) उपकुलसचिव, आचार्य पदवी कक्ष: सदर कार्यालयीन सूचना आपल्या स्तरावरून सर्व मान्यता प्राप्त संशोधन केंद्राचे निदर्शनास आणावी.

21/5/2024

संचालक
मालवीय मिशन शिक्षक प्रशिक्षण केंद्र
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ